RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

१९३/५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक ८(३)] सोमवार, मे ६, २०१३/वैशाख १६, शके १९३५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**—महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. पृष्ठे १-४

दिनांक ५ मे २०१३ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ह. बा. पटेल,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ६ मे २०१३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९५६ चा ४७. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत

अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९५६ चा ४८. १९५६ चा ४९. १९७८ महा. ८.

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २०१३, असे म्हणावे.

(२) तो, १ एप्रिल २०१३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण दोन

### महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ८ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम ८ च्या पोट-कलम (२) मध्ये,— १९५६ चा ४७.

(एक) खंड (अ) मध्ये, "रेल्वेच्या पहिल्या वर्गाने प्रवास" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरने प्रवास" हा मजकूर दाखल करण्यात येईल; आणि "रेल्वेच्या पहिल्या वर्गाचे प्रवास भाडे" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरचे प्रवास भाडे" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) मध्ये, "रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या प्रवासाच्या" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरच्या प्रवासाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल; आणि "रेल्वेच्या पहिल्या वर्गाचा प्रवास" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरचा प्रवास" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १२ब ची सुधारणा.

३. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियमाच्या कलम १२ब मध्ये, "रुपये ८,०००" या मजकुराऐवजी, "रुपये १५,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण तीन

### महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १०ब ची सुधारणा.

४. महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम १०ब च्या पोट-कलम (२) मध्ये,— १९५६ चा ४८.

(एक) खंड (अ) मध्ये, "रेल्वेच्या पहिल्या वर्गाने प्रवास" या मजकुराऐवजी "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरने प्रवास" हा मजकूर दाखल करण्यात येईल; आणि "रेल्वेच्या पहिल्या वर्गाचे प्रवास भाडे" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरचे प्रवास भाडे" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) मध्ये, "रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या प्रवासाच्या" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरच्या प्रवासाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; व "रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या प्रवास भाड्यापेक्षा" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरच्या प्रवास भाड्यापेक्षा" हा मजकूर ; आणि "रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या प्रवासाची" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरच्या प्रवासाची" हा मजकूर, दाखल करण्यात येईल.

९०४/५

५. मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियमाच्या कलम १०क मध्ये, "रुपये ८,०००" या मजकुराऐवजी, "रुपये १५,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १०क ची सुधारणा.

## प्रकरण चार

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा

१९५६ चा ४९. ६. महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात ज्याचा निर्देश, "सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम ५ मध्ये पोट-कलम (१अ) मधील, स्पष्टीकरणाला स्पष्टीकरण एक असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशाप्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या स्पष्टीकरण एक नंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

"**स्पष्टीकरण दोन**.—जेथे सदस्य, आपल्या पत्नीसह किंवा, यथास्थिति, पतीसह विमानाने प्रवास करील किंवा पार पाडील तेथे, अशा प्रकारे केलेला किंवा पार पाडलेला प्रत्येक एकेरी प्रवास या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, दोन एकेरी प्रवास असा मोजण्यात येईल.".

७. सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियमाच्या कलम ५अक च्या पोट-कलम (२) मध्ये,— सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ५अक ची सुधारणा.

(एक) खंड (अ) मधील, "रेल्वेच्या प्रथम वर्गाने" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरने" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; आणि "रेल्वेच्या प्रथम वर्गाचे" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरचे" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) मध्ये, "रेल्वेच्या प्रथम वर्ग प्रवासाचा" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरच्या प्रवासाचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; तसेच, "रेल्वेचा प्रथम वर्ग प्रवास" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे तेथे, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरचा प्रवास" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

८. सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियमाच्या कलम ६ मध्ये पोट-कलम (३) मधील, "रुपये ८,०००" या मजकुराऐवजी ; "रुपये १५,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

## प्रकरण पाच

## महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याची सुधारणा

१९७८ चा महा. ८. ९. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ (यात यापुढे, या प्रकरणांत, ज्याचा निर्देश "विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम ७ च्या पोट-कलम (२) मध्ये,— सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ७ ची सुधारणा.

(एक) खंड (अ) मधील, "रेल्वेच्या पहिल्या वर्गाने प्रवास" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरने प्रवास" हा मजकूर दाखल करण्यात येईल; आणि "रेल्वेच्या पहिल्या वर्गाचे प्रवासभाडे" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरचे प्रवास भाडे" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) मधील, "रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या प्रवासाच्या" या मजकुराऐवजी, "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरच्या प्रवासाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल; तसेच "रेल्वेच्या पहिल्या वर्गाचा प्रवास" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे तेथे "रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरचा प्रवास" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

**१०.** विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १०अ मध्ये, "रुपये ८,०००" या मजकुराऐवजी, "रुपये १५,०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.